**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

संक्र.काअ/ग्रातनिमं/कोप केंस क्र.३७/२०१६-१७/३० दिनांक : २०-०१-२०१७

**<u>आदेश केस क्र.३७/१६-१७</u>**

कै.श्री बाबूराव लक्ष्मण जाधव तर्फे श्री प्रकाश बाबूराव जाधव,
१०/६५६/२२ नटराज चौक, आण्णा रामगोंडा शाळेजवळ
इचलकरंजी जि.कोल्हापूर

**तक्रार अर्जदार (ग्राहक)**

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर.

२) कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, इचलकरंजी

३) उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग ब इचलकरंजी

**विरुध्द पक्षकार**

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय जाहीर करीत आहे.

१) तक्रारदार मयत कै.बाबूराव लक्ष्मण जाधव तर्फे त्यांचा मुलगा श्री प्रकाश बाबूराव जाधव रा. इचलकरंजी जि. कोल्हापूर यांनी सदरचे गा-हाणे, वीज ग्राहक क्र. २५०३८००२२६१० या पूर्वीच कायम स्वरुपी बंद केलेल्या औद्योगिक जोडणीवरील ऑक्टोबर २००८ मध्ये येणे असलेली तथाकथित थकबाकी बेकायदेशीर , कालबाहय व वसुलीस पात्र नाही असे ठरवून मिळणेबद्दल या मंचासमोर दि. ०२.१२.२०१६ रोजी दाखल केले आहे. यापूर्वी तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे दि. २६-०९-२०१६ रोजी दाखल केलेला तक्रार अर्ज सदर कक्षाने दि. १८-११-२०१६ च्या आदेशाने फेटाळून लावला होता.

## तक्रारदार यांचे गा-हाणे

२) इचलकरंजी येथे घर क्र. १०/६५६/२२ यामध्ये कै. बाबूराव जाधव यांचे नावचे सन-१९९६ पासून अस्तित्वात असलेले ग्राहक क्र. २५०६४४००९७४९ चे वीज कनेक्शन कधीही थकबाकीत नव्हते. सदर जागेत बाबूराव यांच्या मृत्यूनंतर त्यांचा मुलगा प्रकाश रहात आहे. याच जागेत पूर्वी प्रकाश बाबूराव जाधव यांनी घेतलेले वीज कनेक्शन ग्राहक क्र. २५०३८००२२६१० हे यापूर्वीच त्यांनी अंतिम देयक भरुन कायम स्वरुपी बंद करुन घेतले होते. त्यानंतर अचानक दिनांक १४-०६-२०१६ रोजी व १४-०९-२०१६ रोजी वि.प. यांनी थकबाकी भरणेबाबत बेकायदेशीर नोटीसा दिल्या. वरील दोन वीज जोडण्या कोणत्या दिनांकापासून दिलेल्या होत्या हे नोटीसीत नमूद केले नाही. तथाकथित थकबाकी ही मुदतबाहय झालेली आहे असे ग्राहकाचे म्हणणे आहे. तक्रारदार यांनी शेवटी अशी विनंती केली आहे की, बंद झालेल्या वीज ग्राहक क्र. २५०३८००२२६१० यावरील तथाकथित थकबाकी रु. २,१५,६८४.५८ पैसे ही वसुलीस अपात्र असलेचे या मंचाने जाहिर करावे.

## वितरण कंपनीची भूमिका

३) मुख्य कार्यालय मुंबई यांच्या सुचनेनुसार कायम स्वरुपी वीज जोडणी बंद केलेल्या ग्राहकांची स्थळ तपासणी करणेत आली आणि प्रकाश जाधव यांच्या वीज कनेक्शनच्या ठिकाणी बाबूराव जाधव यांचे वीज कनेक्शन आढळून आले. वरील कार्यालयाच्या सुचनेनुसार बंद कनेक्शनच्या जागी दुसरे नविन कनेक्शन त्याच नांवे किंवा दुस-या नांवे आढळून आल्यास जुनी थकबाकी नविन कनेक्शनवर चढवणेत येते. प्रकाश जाधव यांना औद्योगिक कनेक्शन मार्च-१९७२ मध्ये दिले होते. मार्च-२००७ नंतर देणेत आलेली वीज देयके प्रकाश जाधव यांनी भरली नाहीत म्हणून दिनांक १०.१०.२००८ रोजी त्यांचे सदर औद्योगिक कनेक्शन कायमपणे बंद कले P.D. Amnesty Scheme चा तक्रारदार यांनी लाभ घेतला पाहिजे. तक्रारदार यांनी थकबाकी भरणेचा आदेश करावा असे वि.प. यांचे म्हणणे आहे.

४) सदर प्रकरणाची सुनावणी दि. १९-०१-२०१७ रोजी मंचासमोर नेमणेत आली. त्यादिवशी तक्रारदार यांचे प्रतिनिधी श्री हरीभाऊ खापरे आणि वि.प. तर्फे श्री जितेंद्र परसू फाळके सहाय्यक अभियंता इचलकरंजी यांचे तोंडी निवेदन ऐकणेत आले सर्व उपलब्ध कागदपत्रांचे वाचन करण्यात आले आहे.

५) या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) वीज ग्राहक क्र. २५०३८००२२६१० या वरील कथित थकबाकी वसुलीस पात्र आहे काय? आणि सदर थकबाकी दुस-या कनेक्शनवर वर्ग करणेबाबत वि. प. यांनी दिलेल्या नोटीस कायदेशीर आहेत काय?
उत्तरः- नाही.

२) कोणता अंतिम आदेश?
उत्तर :- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## <u>कारणमिमांसा</u>

६) इचलकरंजी येथील जागा क्र. १०/६५६/२२ यामध्ये पूर्वी औद्योगिक वीज जोडणी ग्राहक क्र. २५०३८००२२६१० ही प्रकाश बाबूराव जाधव यांचे नावे दिली होती. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार ती जोडणी सन-१९७२ मध्ये दिली होती. सदर जोडणी दि. १०.१०.२००८ रोजी कायम स्वरुपी बंद करण्यात आली. सदर घर जागा क्र. १०/६५६/२२ याचमध्ये मयत बाबूराव लक्ष्मण जाधव यांचे नावे घरगुती वीज जोडणी ग्राहक क्र. २५०६४४००९७४९ दिनांक ०४-१०-१९९६ पासून देणेत आली असेही तक्रारदार यांनी कथन केले आहे.

७) अंतिम बिल भरुन औद्योगिक वीज जोडणी कायम स्वरुपी बंद करुन घेतली होती असे प्रकाश जाधव यांचे म्हणणे आहे. तथापि त्यानी त्याबाबत पावती वगैरे कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. दि.२३.०३.२००७ पर्यन्त प्रकाश जाधव यांनी वेळोवेळी दिलेली देयके भरलेली होती. मात्र त्यानंतर त्यांनी देयके भरली नाहीत म्हणून अखेर दि. १०.१०.२००८ रोजी त्यांचे औद्योगिक कनेक्शन P.D करणेत आले असे वि.प. यांनी नमूद केले आहे.

८) दि. १०.१०.२००८ नंतर वि.प. यांनी तथाकथित थकबाकी वसूल करणेसाठी प्रकाश जाधव यांचे विरुध्द कोणतीही कारवाई केली नाही. असे दिसून येते. अचानक दि. १४.०६.२०१६ रोजी आणि पुन्हा दि. १४.०९.२०१६ रोजी सदर थकबाकी दुस-या वीज जोडणीवर वर्ग करण्यात येईल वगैरे आशयाच्या नोटीसा वि.प. यांनी तक्रारदार यांना पाठवल्या.

९) मार्च-२००७ नंतर प्रकाश जाधव यांनी काहीही रक्कम वि.प. कडे भरली नाही, परंतु
त्यांचे खाते नोव्हेंबर २०१५ पर्यन्त चालू राहिले. परंतु मार्च-२००७ नंतरच्या वीज देयकांमध्ये कथित थकबाकीची रक्कम अव्याहतपणे दर्शवून अशी देयके तक्रारदार यांना सातत्याने दिली जात होती. याबाबत काहीही कागदोपत्री पुरावा वि.प. यांनी दिलेला नाही.

१०) विद्युत कायदा २००३ मधील कलम ५६ नुसार वि.प. यांनी थकबाकी वसूलीसाठी कोणताही दावा (Suit) सक्षम न्यायालयात दाखल केलेला नाही असे दिसून येते. कलम ५६(१) प्रमाणे, केवळ वीज जोडणी कायम स्वरुपी खंडीत करण्याची कारवाई ऑक्टोंबर २००८ मध्ये करण्यात आली होती. कलम ५६(२) मधील स्पष्ट तरतूदीनुसार वसुलीस पात्र असलेली रक्कम सततपणे (Continuously) वीज देयकांमध्ये दाखवून कायदेशीर मार्गाने वसूलीची कारवाई चालू ठेवल्या शिवाय, मागिल दोन वर्षापेक्षा अधिक काळाची थकबाकी कालबाहय ठरते आणि ती वसूलीस पात्र रहात नाही. वादग्रस्त औद्योगिक वीज जोडणी वरील थकबाकी ऑक्टोंबर २००८ पूर्वीची असून ती अव्याहतपणे, वेळोवेळी ग्राहकाला दिलेल्या वीज देयकामध्ये सातत्याने दर्शविलेली नसल्याने मुदतबाहय झालेली आहे. त्यामुळे अशी थकबाकी वसूलीस पात्र नाही असे या मंचाचे स्पष्ट निष्कर्ष आहेत.

११)वि.प. तर्फे वरीष्ठ कार्यालयाचे "अत्यंत तातडीचे"पत्र इतर दोन पत्रे परिपत्रक यांच्या
प्रती दाखल केल्या आहेत. तथापि , जी तथाकथित थकबाकी विद्युत कायदा कलम ५६(२) प्रमाणे मुदतबाहय झाली आहे. ती वसूली करण्यास असे परिपत्रक कायद्याचे स्वरुप धारण करु शकत नाही. वास्तविक दि. १०.१०.२००८ रोजी प्रकाश जाधव यांची औद्योगिक जोडणी कायम स्वरुपी खंडीत केल्यानंतर किंवा त्यापूर्वीच वि.प. यांच्या संबंधीत कार्यालयाने/अधिकारी कर्मचा-यांनी थकबाकी वसूलीसाठी योग्य ती कायदेशीर कारवाई करणे आवश्यक होते.

१२) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ मधील कलम १०.५ मधील तरतूद व त्यातील परंतुकात नमूद केलेली सहा महिन्यांची मुदत विचारात घेता सदर तरतूद या प्रकरणात लागू पडत नाही असे या मंचाचे मत आहे.

वरील सर्व कारणास्तव खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येतो.

**आदेश**

१) तक्रारदार यांचे विरुध्द वि.प. यांनी वीज ग्राहक क्र. २५०३८००२२६१० यावरील कथित थकबाकी वसूल करणेसाठी दि. १४.०६.२०१६ आणि दि. १४.०९.२०१६ च्या नोटीसाद्वारे सुरु केलेली कारवाई कायदेशीर नाही आणि अशी वसूलीची कारवाई मुदतबाहय झाली आहे.असे ठरवणेत येत आहे. सबब , वि.प, यांना तथाकथित थकबाकी तक्रारदार यांचेकडून वसूल करता येणार नाही.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |